# मोत्यांचे कणीस



शं. रा. देवळे
रं. म. जोशी
निर्मलगुरुजी

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. ४५७

केमकर प्रकाशन

लहान मुलांकरिता


... शाखा.

सा. क्र. ४५७ दिनांक ......

विषय ...... क्र. ..........


# मोत्यांचे कणीस


शं. रा. देवळे

रं. म. जोशी

निर्मलगुरुजी



केमकर प्रकाशन

प्रकाशन क्रमांक: २८

प्रकाशक
सौ. सुवर्णा केमकर
केमकर प्रकाशन
१५२, शनिवार पेठ
पुणे ४११०३०

सर्व हक्क प्रकाशिकाधीन

प्रथमावृत्ती: मार्च १९७९

चित्रकार
र. ग. कंटक

मुद्रक
प्रभाकर सरदेसाई M.Sc.
अमर मुद्रणालय,
६० बन्हाणपुर, वलवण
लोणावळा, ४१०४०१

प्राप्तिस्थान
अरगडे आणि मंडळी
अप्पाबळवंत चौक
पुणे ४११०३०

किंमत रु. १-२५

## :१: मोत्यांचे कणीस

राजकुमाराचा वाढदिवस होता. थाटाचा समारंभ होता. वाजंत्री वाजली. नौबती झडल्या. सडे, रांगोळी, पताका राजधानीत मोठी गडबड उडाली.

दुपारी मेजवानी झाली. सर्वांनी गोड पक्वान्नाचे जेवण मिळाले. नंतर दरबार भरला. राजकुमाराला नजराणे झाले. कोणी भरजरी कपडे दिले. कोणी सोन्याच्या अंगठ्या दिल्या, कोणी हिरे दिले–अशा भेटवस्तू राजकुमाराला मिळाल्या.

एक शेतकरी आला. राजकुमाराला त्याने एक कणीस दिले. सर्वांना नवल वाटले. ही कसली भेट ? राजकुमाराने ते कणीस नीट पारखून पाहिले. ते होते मोत्यांचे कणीस.

राजकुमार म्हणाला, "हे कणीस मोत्यांचे



BVEK-0-00451

कसे ? कणीस तर दाण्यांचे असते. ''

शेतकरी म्हणाला, ''हे कणीस मला माझ्या मळ्याने दिले आहे. माझ्या कष्टाचे हे फळ आहे. तुम्हीसुद्धा असे कणीस मिळवू शकाल.''

दरबार संपला. लोक निघून गेले. पुढे काय गंमत झाली. एक दिवशी तो राजकुमार उठला. त्याने त्या कणसातील मोती काढले. बागेत वाफे तयार केले. ते मोती जमिनीत पेरले.

सहा महिने झाले तरी मोत्याचे एकही झाड उगवले नाही. असे का झाले ? मग राजकुमाराने त्या



शेतकऱ्याला पुन्हा बोलाविले. त्याला सारे सांगितले.

शेतकरी हसला. तो म्हणाला, " मोती पेरून झाड कसे उगाविणार? अहो माझ्या मळ्यात मी मक्याचे पीक काढतो. चांगली मशागत करतो. खूप उत्पन्न येते. तो मका विकतो. खूप पैसे मिळवितो.

त्या पैशातून मी काही मोती घेतो. पंचवीस वर्षे मी असे केले तेव्हा हे मोती साचले.

माझी मुलगी हुशार आहे. तिने त्या साचलेल्या मोत्यातून चांगले टपोरे मोती निवडले. ते गुंफून हे कणीस तयार केले. सुंदर भेटवस्तू म्हणून ते कणीस तुम्हाला दिले."

शेतकऱ्याने हा खुलासा केला. राजकुमाराला आनंद झाला. तो म्हणाला, "तुमची मुलगी कष्टाळू आहे. हुशार आहे. कलावन्त आहे. चतुर आहे. तिला राजवाड्यात घेऊन या. आम्ही तिचा सत्कार करू. आभार मानू. परतभेट म्हणून तिला साडी चोळी करू!"

राजाला ही गोष्ट कळाली. राजाने तीच मुलगी आपली सून केली. पुढे ती राणी झाली. तिने देशातील शेतीची खूप सुधारणा केली.

⊙ ⊙

## :२: मूठभर मोहऱ्या

"अजून रोहित घरी आला नाही! दुपार टळली. गाय हंबरू लागली. तिला चारा नाही. गवत आणायला रोहितला आज का बरं इतका उशीर लागला?" रोहितची आई किसा काळजी करीत होती. ती त्याची वाट पहात होती.

तेवढ्यात एक माणूस आला. धापा टाकीत तो म्हणाला, "रोहितला रानात साप चावला आहे." किसाने ते ऐकले. तिने एकदम हंबरडा फोडला, "देवा रे देवा, हे काय झाले!"

किसा धावत सुटली. ती रानात गेली तिने बाळाला मांडीवर घेतले. ती रडत होती. लोकांनी तिची समजूत घातली. पण छे! किसा पुत्रशोकाने वेडी झाली होती. ती कळवळून म्हणाली, "माझ्या रोहितला उठवा हो! हा माझा आधार आहे. माझी

आंधळ्याची काठी. ऊठ रे बाळा ऊठ ना."

पण रोहित कसा उठणार? मग किसाच उठली. ती म्हणाली, "मी बुद्धदेवाकडे जाते. ते तुला ........"

किसा बुद्धदेवाकडे गेली. रडत म्हणाली, "जगाचं दुःख हलकं करण्यासाठी तुम्ही राज्य सोडलं आणि संन्याशी झाला. माझं दुःख हलकं करा. माझा बाळ रोहित मेला आहे. त्याला उठवा!"

बुद्धदेव शांतपणे म्हणाले, "आई मी तुझं दुःख हलकं करीन. त्यासाठी तुझा रोहित उठवण्यास एक औषध करावं लागेल. आणशील का एक पदार्थ?"

"हो हो आणीन. सांगा देवा वाटेल ते सांगा. मी पाहिजे तेवढा खर्च करीन. प्राण द्यावा लागला तरी देईन पण तो पदार्थ आणून देईन. बोला सांगा." किसा तळमळून सांगत होती. बुद्धदेव गंभीरपणे म्हणाले "आई मला फक्त मूठभर मोहऱ्या दे!"

"मूठभर मोहऱ्या? त्या तर आत्ता आणते. माझ्या घरात आहेत." असे म्हणत किसा निघाली. तिला अडवून बुद्धदेव म्हणाले, "छे छे. किसा, त्या मोहऱ्या चालणार नाहीत. ज्या घरात आतापर्यंत एकही माणूस मेलेला नाही त्या घरातीलच पाहिजेत."



किसा निघाली. घरोघर फिरली, वणवण हिंडली. प्रत्येक घरात यापूर्वी कोणी ना कोणी मेलेलाच होता. कुणीही कधीच मेलेले नाही असे एकही घर किसाला मिळाले नाही. शेवटी ती निराश झाली. बुध्ददेवाकडे ती परत आली. मान खाली घालून उभी राहिली.

बुद्धदेव म्हणाले, "पाहिलंस ना माई, मृत्यू कुणाला चुकला नाही. दुःख, रोग, म्हातारपण आणि मरण ह्या गोष्टी प्रत्येकाला आहेतच! जगात तूच

एकटी दुःखी नाहीस. तुझा रोहितबाळ परत येणार नाही. दुःख आवर. ज्या मुलांची आई मेली आहे अशा अनेक अनाथ चिमण्यांची तू आई हो. त्यांना तुझं मातृप्रेम दे. जा!"

किसाचे मन शांत झाले. तिला आपल्या गावातील अनाथ मुले दिसू लागली. त्यांच्या रूपात तिला तिचा रोहित दिसू लागला. तिने डोळे पुसले. बुध्ददेवांना वंदन केले आणि मग ती शांतपणे तेथून निघून गेली.

⊙ ⊙

## :३: तेच हत्यार उत्तम

अकबर बादशहा आणि बिरबल प्रधान यांच्या बऱ्याच गोष्टी आहेत. बिरबल हा मोठा हुशार होता, चतुर होता. धोरणी होता. अनुभवी होता. तो कोणत्याही प्रश्नाचे उत्तर चटकन् देई. म्हणून त्याला हजरजबाबी म्हणत.

एकदा काय गंमत झाली. बादशहाचा दरबार भरला होता. सारे प्रधान, सेनापती आणि मानकरी बसले होते. बादशहाने सर्वांना एक प्रश्न विचारला. बादशहा म्हणाला, "सगळ्यात उत्तम असे हत्यार कोणते ?"

एक जण म्हणाला, "तलवार हे हत्यार सर्वात उत्तम आहे." दुसरा म्हणाला, "बंदुक हेच हत्यार उत्तम." कोणी म्हणाला, तोफ उत्तम. कोणी खंजीर तर कोणी कट्यार अशी हत्यारांची अनेक नावे सर्वांनी सांगितली. शेवटी बिरबल म्हणाला, "लोकहो, उगाच कोणत्याही हत्याराचे महत्व सांगू नका. ऐनवेळी हाती जे हत्यार असेल तेच उत्तम असते!"

बिरबलाच्या उत्तराने कोणाचेही समाधान झाले नाही. बादशहा म्हणाला, "बिरबल तुम्ही सांगता तसे कोणते हत्यार आहे? नाव सांगा."


बिरबल म्हणाला, "खाविंद, त्या हत्याराचे नाव सांगता येणार नाही. मात्र मी हे खात्रीने सांगतो की, आपल्या जीवावर बेतले असता ऐनवेळी हाती जी वस्तू सापडेल तीच हत्याराचे काम करते. तीच वस्तू आपला जीव वाचवते आणि आपल्या उपयोगी पडते! हाती जे तेच हत्यार उत्तम."

बादशहाने विचार केला आणि एके दिवशी बिरबलची परीक्षा पाहावी म्हणून संधी साधली. बादशहाने एक मस्त हत्ती तयार करण्यास सांगितले. बिरबल दररोज ज्या रस्त्याने दरबाराला येतो त्या रस्त्याच्या बोळात बिरबलाला पायी येताना पाहायचे आणि त्याच्या अंगावर तो मस्त हत्ती सोडून द्यायचा. बिरबलला कोठेही निसटून जाण्यास जागा राहणार नाही, त्याची कोंडी होईल. मग पाहू कोणते हत्यार तो वापरतो ते!

बादशाहाने अशी योजना ठरविली होती. बिरबलाला त्या योजनेची कल्पनाही नव्हती. नेहमी-प्रमाणे तो एके दिवशी घरून निघाला. दरबाराला जाण्याच्या वाटेवरील बोळात शिरला आणि पाहतो तर काय नवल?

त्या बोळात दुसऱ्या बाजूने बिरबलाच्या समोरून एक भला मोठा मस्त हत्ती धावत आला. "बापरे! आता काय करावे? हा हत्ती आपल्या अंगावर येणार. तो आपल्याला चिरडून टाकणार! इकडे तिकडे लपण्यासारखी जागा नाही. काय करणार?" बिरलबला मोठा प्रश्न पडला.

विचार करायलाही वेळ नव्हता. तो हत्ती



सारखा पुढे पुढेच येत होता. तो बिरबलाच्या अगदी अंगावर येणार तोच बिरबल खाली वाकला आणि त्याने रस्त्याच्या कडेला दडलेले एक कुलुंगी कुत्रे हातात धरले. त्या कुत्र्याची तंगडी धरून त्याने त्याला गरगरा फिरवले, आणि एकदम तो कुत्रा त्याने हत्तीच्या अंगावर भिरकावला.

क्यँव क्यँव करीत तो कुत्रा त्या हत्तीच्या अंगावर पडला. त्याने हत्तीच्या सोंडेला घट्ट पकडले आणि खूप ओरबाडले. अचानक घडलेला तो प्रकार

बघून हत्ती गोंधळला. तो एकदम मागे मुरडला आणि सोंड झटकीत चीं ऽ चीं करीत मागे पळून गेला.

बिरबलाचे संकट टळले. तो हात झटकीत पुढे चालू लागला. बोळीतील माडीच्या सज्ज्यात बादशाह उभा राहिला होता. पुष्कळ लोक बिरबलाचा कसा चेंदा होतो ते पाहण्यासाठी त्या माडीवर जमले होते. पण बिरबल हत्तीच्या तडाख्यातून सहीसलामत वाचल्यामुळे त्यांची फार निराशा झाली.

नंतर दरबारात जेव्हा हा विषय निघाला तेव्हा बिरबल म्हणाला, "पाहिलेत ना! ऐनवेळी माझा जीव वाचविण्यासाठी मला कोणते हत्यार सापडले ते! अहो, कुत्रा हेच हत्यार उत्तम ठरले ना? वेळेवर हाती असेल तेच हत्यार उत्तम!" बिरबलाच्या चतुरपणाबद्दल बादशाहाने त्याचा मोठा सन्मान केला.


⊙ ⊙

## ४ [illegible]

गंगा नदीच्या काठीवर स्वामीजी बसले होते. लाटांवर लाटा येत होत्या. त्यांचा खेळ ते पाहात होते. तेवढ्यात नदीतून एक काठी वाहात चालली होती. स्वामीजींनी ती काठी पाहिली. आणि काय नवल— त्या काठीवर एक विंचू बसला होता तो त्यांना दिसला.

"अरेरे! बिचारा विंचू. तो आता पाण्यात बुडणार आणि मरणार!" स्वामीजींना त्या विंचवाची दया आली. त्यांनी विचार केला नाही. ते ताडकन् उठले. त्यांनी पटकन पाण्यात उडी टाकली आणि ती काठी आपल्या हातात घेतली.

पण काठावरील विंचू पाण्यात पडला. स्वामीजींनी काठी टाकली आणि पाण्यातील विंचू आपल्या हातात धरला. विंचवाने स्वामीजींच्या हाताला नांगी मारली



आणि पटकन् पाण्यात उडी घेतली. स्वामीजींनी पुनः त्या विंचवाला धरले. विंचवाने पुन्हा स्वामीजींच्या हाताला नांगी मारली आणि पटकन पाण्यात उडी घेतली.

पाण्यात पडलेल्या विंचवाला स्वामीजींनी हातात घ्यावे. विंचवाने स्वामीजींच्या हाताला नांगी मारावी आणि पाण्यात उडी घ्यावी असा प्रकार पुनः पुनः किती तरी वेळ झाला.

नदीच्या काठावर दुसरा एक माणूस उभा होता.

त्याने स्वामीजींचा आणि विंचवाचा तो प्रकार पाहिला. तो माणूस हसून स्वामीजींना म्हणाला, "अहो कशाला वाचविता त्या दुष्टाला. तो विंचू वारंवार नांगी मारतो आहे. तुम्हाला तो दंश करतो आहे. त्रास देतो आहे. तरीही तुम्ही त्याला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहात जाऊ द्या ना. त्याला द्या फेकून पाण्यात. मरू द्या त्याला!"

त्या माणसाला स्वामीजी शांतपणे म्हणाले, "अरे बाबा विंचवासारखा क्षुल्लक प्राणीही आपला नांगी मारण्याचा गुणधर्म सोडत नाही मग मी तर माणूस आहे. दुसऱ्याचा जीव वाचविण्याचा माणसाचा गुणधर्म आहे. तो मी का बरं सोडू? दुसऱ्याला जगविणे हाच श्रेष्ठ माणूस धर्म आहे!"

स्वामीजींचे ते शब्द ऐकून तो माणूस गप्प झाला. स्वामीजींचा थोरपणा त्याला पटला. "दुष्टावर सुद्धा दया करावी आणि त्याला आपला थोरपणा पटवावा!" हाच धडा त्या माणसाने या प्रसंगी स्वामीजींकडून घेतला.

ते स्वामीजी कोण होते? ते होते महात्मा स्वामी रामकृष्ण परमहंस. ज्या स्वामी विवेकानंदांनी थोर मानवधर्माची पताका जगभर फडकाविली त्यांचे ते गुरू!

## :९: बुंदीचे लाडू

एक होता भिवा आणि एक होता शिवा. भिवा होता लठ्ठ. शिवा होता बारीक. भिवा म्हणायचा 'मीच शहाणा'. शिवा म्हणायचा 'मीच शहाणा'. दोघेही खूप भांडत असत.

शेजारी बाबुराव रहात होते. त्यांनी दोघांचे भांडण ऐकले. मग बाबुराव म्हणाले, "भिवा इकडे ये. शिवा इकडे ये. खरा शहाणा कोण ते पाहू का? तुमची परीक्षा घेऊ का?"

'हो हो घ्या!' दोघेही कबूल झाले.

बाबुरावांनी दोन पेट्या आणल्या. एकेका पेटीत शंभर शंभर लाडू ठेवले. ते होते बुंदीचे लाडू. भिवाला एक खोली दिली. शिवाला एक खोली दिली. प्रत्येक खोलीत पाण्याची घागर भरून ठेवली. प्रत्येक खोलीत लाडूची पेटी ठेवली. मग बाबुराव म्हणाले,


“भिवा आणि शिवा, तुम्ही खोलीत राहायचे. तीन दिवस राहायचे. मी खोली उघडीन. पेटीतले शंभर लाडू मोजून घेईन. ‘शहाणा कोण’ ते नंतर ठरवीन.”

भिवा आणि शिवा खोलीत राहिले. बाबुरावांनी खोल्या बंद करून ठेवल्या.

भिवाला भूक लागली त्याने विचार केला. पेटीत लाडू आहेत, पण ते खाणार कसे? “शंभर लाडू कायम राहिले पाहिजेत. लाडू खाल्ले तर मी शहाणा ठरणार नाही.” भिवा पाणी प्यायला आणि तसाच पडून राहिला. तीन दिवस त्याने लाडूला हात लावला नाही.

शिवाला भूक लागली. त्याने विचार केला. पेटीत लाडू आहेत, पण ते खाणार कसे? “शंभर लाडू कायम राहिले पाहिजेत. कसे बरे राहतील कायम? हां हो युक्ती केली पाहिजे. बुंदी खायचीच पण लाडू कायम ठेवायचे!”

शिवाने पेटीतील एक लाडू काढला. तो कागदावर ठेवला. एकेक करून सगळे लाडू बाहेर काढले. ते कागदावर ठेवले. लाडू हाताळले गेले. काही कळ्या पेटीत पडल्या. काही कळ्या कागदावर सांडल्या.



शिवाने पेटीतील कळ्या काढल्या. मग एकेक लाडू पेटीत ठेवला. शंभर लाडू कायम होते. शिवाने फक्त कळ्या खाल्ल्या. त्याचे पोट भरले. तीन दिवस त्याने असाच उद्योग केला. शिवाचे पोट भरायचे. शंभर लाडू कायम राहायचे.

तीन दिवस झाले. बाबुरावांनी खोल्या उघडल्या. भिवा थकला होता. लठ्ठ भिवा अशक्त झाला होता. शिवा मात्र तरतरीत होता. दोघांवर बाबुरावांची

नजर होती. त्यांनी शिवाचा उद्योग पाहिला होता. त्यांना शिवाचे कौतुक वाटले.

बाबुराव म्हणाले, "शिवाच शहाणा आहे. त्याने लाडू क़ायम ठेवले, पण युक्ती करून पोट भरले. तो अडला नाही. नुसताच पडून राहिला नाही!"

भिवा म्हणाला, "खरंच! शिवा शहाणा आहे. मला काहीच सुचले नाही. मी आता भांडणार नाही." भांडण मिटले. दोघांनी बाबुरावांचे आभार मानले

## ६ एकदा नाही तीनदा

गेनू आपल्या दुकानात वहाण शिवीत बसला होता. तो आता काही नवीन प्रकारच्या चपला करण्यात गुंतला होता. बाजूच्या भिंतीला चपलांच्या रांगा ओळीने टांगलेल्या होत्या. त्यामध्ये लहान,

मोठ्या, साध्या, सर्व प्रकारच्या चपला दिसत होत्या. गावात तो फार प्रसिद्ध होता.

आज तो अगदी आनंदात दिसत होता. काल रात्री तो आपल्या एकतारीवर तुकारामाचा अभंग आळवून म्हणत असताना त्याने आवाज ऐकला, "मी उद्या तुझ्या दुकानात येणार आहे."

त्याला वाटले आपल्या विठोबाचा हा आवाज आहे आणि विठोबा आपल्याला आज भेटणार, म्हणूनच गेनू आज खुषीत होता.

दुकानात त्याचे काम चालू होते, तरी त्याचे लक्ष रस्त्याकडे होते. तो विठोबाची वाट पहात होता. इतक्यात एक म्हातारा मनुष्य रस्त्याने काठी टेकीत टेकीत चाललेला त्याला दिसला. गेनूचे लक्ष सहज त्याच्या पायाकडे गेले. काहीतरी लागल्यामुळे त्यातून रक्त येत होते.


गेनू म्हणाला, "म्हातारबाबा पायाला काय झाले हो तुमच्या?"

म्हातारा म्हणाला, "काय करू बाबा? पायाला काटा बोचला. गरीबाला कुठल्या आल्या आहेत वहाणा?"

गेनू म्हणाला, "इकडे या. या वहाणा घाला



४५१



पाहू."

म्हातारा म्हणाला, "कल्याण होईल बाबा तुझं. गरिबावर अशीच दया करीत जा."

गेनू विठोबाची केव्हापासून वाट पहात होता. त्याला आज विठोबा येण्याचे चिन्ह दिसेना.

इतक्यात एक गरीब बाई डोक्यावर मोठे थोरले ओझे आणि कडेवर मूल घेऊन चालली होती. ती फारच दमलेली दिसत होती. तिच्या कडेवर मूल रडत होते. गेनूला तिची दया आली. तो म्हणाला,

"बाई, ते ओझे किती जड आहे! जरा ठेवा तेथे आणि बसा घटकाभर."

बाईला बरे वाटले. तिने ओझे दुकानाच्या बाजूस ठेवले. गेनूने आपल्या शिदोरीतील दोन चतकोर भाकरी एका थाळीत घालून तिच्या पुढे ठेवली आणि कासंडी मधील थोडे दूध वाटीत ओतून शेजारी ठेवले. तो म्हणाला, "घ्या बाई हे. मुलाला पण घाला थोडे."

बाई म्हणाली "उपकार आहेत बाबा तुझे. देव तुझे भले करो." भाकरी खाऊन बाई निघून गेली.

संध्याकाळ झाली. काळोख पडू लागला. तरी देव का येत नाही, याचे गेनूला कोडे पडले. रात्री आवाज ऐकला तो केवळ भास असेल, असे त्याला वाटले.

इतक्यात एका मुलीच्या रडण्याचा आवाज आला. रस्त्यात मुलगी बावरल्यासारखी दिसत होती. ती सैरावैरा पळत होती आणि मोठ्याने रडत होती. गेनू पुढे झाला. आणि त्याने तिचा हात धरला. त्याने तिच्या पाठीवरून हात फिरवला आणि तिला विचारले, "बाळ का ग रडतेस तू?"

ती म्हणाली, 'माझं घर माझी आई कुठं आहे?'

"सगळे काही सापडेल बरं." गेनू म्हणाला. त्याने तिला आत नेले. एक कपात दूध प्यायला दिले. तिला आनंद झाला. तिची भीती कमी झाली. गेनूने हळूहळू तिच्याकडून तिचा सगळा पत्ता काढून घेतला आणि तिला तिच्या घरी नेऊन आईच्या स्वाधीन केले. दुकानात त्याचा बारा वर्षांचा मुलगा बसला होता. परत आल्यावर त्याने त्याला विचारले, "आपल्याकडे कोणी आले होते काय?"

तो म्हणाला, "नाही. कोणीही आले नाही."

आता काळोख पडला होता. विठोबाची वाट पाहून तो घरी निघाला.

निजण्यापूर्वी एकतारीवर भजन करताना त्याच्या मनात आले, विठोबाने आपल्याला फसविले. इतक्यात एकतारीतून आवाज आला. "नाही गेनू, देव कधीही फसवत नसतो. तुझ्या दुकानात मी तीन वेळा येऊन गेलो. तो म्हातारा, ती ओझेवाली आणि ती चुकलेली मुलगी म्हणजे दुसरे कोणी नसून मीच होतो तू त्यांना जी मदत केलीस ती मला पोहचली."

हे ऐकून गेनूला फार आनंद झाला. तो भजन करीत करीत नाचू लागला.

वा. क्र. ८५७